# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>जाहिरात</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्रमुख लेखापालांच्या खात्यांमध्ये रु.5200-20200+ग्रेड पे 2400 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील `कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक' या संवर्गातील रिक्त पदे भरावयाची आहेत. त्यासाठी निवड यादी तयार करावयाची असल्याने खाली नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी स्वतः खात्री करावयाची आहे की, अर्ज करीत असलेल्या पदासाठी ते विहित अर्हता व अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता पात्र आहेत अशा उमेदवारांनी **<u>http://portal.mcgm.gov.in</u>** या वेबसाईटवरून अर्ज करावेत. अर्ज करण्यासाठी उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा (valid) ई-मेल आय.डी. असणे आवश्यक आहे आणि भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑन-लाईन देण्यात येणार असल्याकारणाने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आय.डी. वैध राहणे आवश्यक आहे.

**I. रिक्त पदांचा तपशिल -**

**<u>सामाजिक व समांतर आरक्षणाने भरावयाची पदे</u>**

| | पदाचे नाव - कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक | अनुशेषांतर्गत पदे | | | | | | | | खुला प्रवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | | |
| | **रिक्त पदे** | **56** | **34** | **10** | **14** | **12** | **8** | **58** | **-** | **147** | **339** |
| | **<u>समांतर आरक्षण :</u>** | | | | | | | | | | |
| 1 | माजी सैनिक (15%) | 8 | 5 | 2 | 2 | 2 | 1 | 9 | - | 22 | 51 |
| 2 | खेळाडू (5%) | 3 | 2 | 1 | 1 | - | - | 3 | - | 7 | 17 |
| 3 | प्रकल्पग्रस्त (5%) | 3 | 2 | - | 1 | 1 | - | 3 | - | 7 | 17 |
| 4 | भूकंपग्रस्त (2%) | 1 | 1 | - | 1 | - | - | 1 | - | 3 | 7 |
| 5 | महिला (30%) | 17 | 10 | 3 | 4 | 4 | 3 | 17 | - | 44 | 102 |
| 6 | अंशकालीन पदवीधर(10%) | 6 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | - | 15 | 34 |
| 7 | सर्वसाधारण | 18 | 11 | 3 | 4 | 4 | 3 | 19 | - | 49 | 111 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | अपंगांसाठी आरक्षित पदे | अंशतः दृष्टीहीन (B/LV) : 04, अंशतः कर्णबधीर (HH) : 08, अस्थिव्यंग/सेरेब्रल पाल्सी (OH/CP) : 08 (सदरची रिक्त पदे उपरोक्त तक्त्यात अंतर्भुत करण्यात आलेली आहेत.) | 20 |

**<u>टिपः-</u>**

- **भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.**
- **रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अंशतः / पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.**
- **समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.**
- **अपंग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या सदर जाहिरातीत पाहून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.**

**II. समांतर आरक्षण -**

1) माजी सैनिकांसाठी 15% प्रमाणे आरक्षित पदे शासन निदेशानुसार भरण्यात येतील.

2) उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि. 30.4.2005 अन्वये शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

3) सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यांनुसार ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पांसाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

4) भूकंपग्रस्तांची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भूकंप-1008/प्र.क्र.145/2008/16-अ दि.27 ऑक्टोबर, 2008 आणि शासन निर्णय क्र.भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि.27 ऑगस्ट, 2009 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींनुसार भरण्यात येतील.

5) महिलांसाठी 30% प्रमाणे आरक्षित पदे शासन नियमानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

6) अपंगांची रिक्त पदे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार भरण्यात येतील. अपंग उमेदवाराकरिता 3% आरक्षणानुसार अनुक्रमे अंशत: दृष्टीहीन (B/LV) : 04, अंशत: कर्णबधीर (HH) : 08, अस्थिव्यंग / सेरेब्रल पाल्सी (OH/CP) : 08 पदे उपलब्ध होणा-या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. अपंगांच्या अनुशेषांतर्गत भरावयाची पदे ही एकूण पदात दर्शविण्यात आली आहेत.

7) शासन निदेशानुसार स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाचे अर्हता व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करून घेण्यात येईल.

8) महाराष्ट्र शासनाच्या ‘सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य’ ह्या योजनेअतंर्गत राज्य शासनाच्या कार्यालयात अंश:कालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक कर्मचा-यांना 10% समांतर आरक्षण शासन निदेशानुसार लागू राहील.

**III. <u>विहित अर्हता</u> -**

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकासः (दि. 18.01.2016 रोजी)

1) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वित्तीय/प्रगत लेखांकन आणि लेखापरिक्षण या विषयासह वाणिज्य शाखेचा पदवीधर असावा.

2) उमेदवार शासन मान्यताप्राप्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) किंवा उच्च परीक्षा प्रत्येकी 100 गुणांचे मराठी आणि इंग्रजी हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

3) संगणकविषयक ज्ञान : उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे `सीसीसी' किंवा `ओ' स्तर किंवा `ए' स्तर किंवा `बी' स्तर किंवा `सी' स्तर या स्तरावरील प्रमाणपत्रधारक किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे `MS-CIT' किंवा `GECT' चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासन या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## IV. बी.कॉम परीक्षेतील टक्केवारीची किमान मर्यादा -

1) खुल्या प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांना - किमान 60%
2) सर्व मागासप्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांना (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवारांना) - किमान 50%

   इतकी किमान टक्केवारीने वित्तिय / प्रगत लेखांकन आणि लेखा परीक्षण या विषयासह बी.कॉम परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

3) अपंग व खेळाडूंकरितांच्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे उमेदवार सुध्दा वित्तिय / प्रगत लेखांकन आणि लेखा परीक्षण या विषयासह किमान बी.कॉम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## V. वयोमर्यादा -

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकासः (दि. 18.01.2016 रोजी)

1) खुल्या प्रवर्गासाठी 33 वर्षांपेक्षा जास्त नसावे.
2) मागासवर्गीय प्रवर्गासाठी 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे.
3) शासन निर्देशानुसार अपंगांसाठी 45 वर्षांपेक्षा जास्त नसावे.
4) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्ष इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत राहील.
5) स्वातंत्र्यसैनिक व त्यांच्या नामनिर्देशितांच्याबाबतीत खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि मागासवर्गीयांसाठी 45 वर्षांपेक्षा जास्त नसावे.
6) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता उपरोक्त पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षांपर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल.
7) अंशकालीन पदवीधर या आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांची वयोमर्यादा 46 वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.
8) उमेदवार अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास त्याच्यासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

## VI. निवडीचे निकष -

1. सदर पदासाठी जाहिरातीत नमुद केलेल्या सेवाप्रवेश निकषांनुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून सामाजिक/समांतर आरक्षणानुसार निवड यादी तयार करण्यात येईल.
2. ऑनलाईन परीक्षेत सामान्य ज्ञान, बौधिक क्षमता व लेखा विषयक अशा तीन विषयांची अनुक्रमे 20, 20 व 60 गुणांची अशी एकत्रित 100 गुणांची परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक विषयात किमान 40 टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. तथापि, उत्तीर्ण होण्याकरिता एकूण 50 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेले गुण हे दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान असल्यास अशावेळी ज्या उमेदवाराचे वाणिज्य (B.Com.) परिक्षेत अधिक गुण असतील त्या उमेदवाराला प्राधान्यक्रम देण्यात येईल, जर वाणिज्य (B.Com.) परिक्षेतील गुण समान असल्यास अशावेळी प्रथम बारावी (H.S.C.) परिक्षेचे गुण व तेही समान असल्यास दहावी (S.S.C.) परिक्षेचे गुण विचारात घेऊन प्राधान्यक्रम देण्यात येईल. तसेच वरील तीन्ही परीक्षेतील गुण समान असल्यास, वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.
4. उमेदवार बारावी (H.S.C.) किंवा दहावी (S.S.C.) परीक्षा दुस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास अशावेळी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

5. विद्यापीठ / संस्था यांनी ज्या गुणांच्या आधारे अंतिम प्रमाणपत्रामध्ये वर्ग / श्रेणी दिलेली असेल त्याच गुणांच्या आधारे टक्केवारीचे परिगणन करण्यात येईल.

**ऑन-लाईन परीक्षेमध्ये खालील वस्तुनिष्ठ प्रश्न-पध्दतीचा अंतर्भाव असेल :**

| अ.क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | उत्तीर्ण गुण संख्या | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य ज्ञान | 20 | 20 | प्रत्येक विषयात किमान 40 % गुण मिळणे आवश्यक तथापि एकुण गुणांची बेरीज 50% असणे आवश्यक आहे | 60 मिनिटे |
| 2 | बौध्दिक क्षमता | 20 | 20 | | |
| 3 | लेखाविषयक ज्ञान | 60 | 60 | | |

**टीपः-** उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे किंवा कोणतेही कारण न देता भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील.

## VII. <u>निवडीची कार्यपध्दती</u> :-

1) परीक्षा केवळ ऑनलाईन पध्दतीने मराठी व इंग्रजी माध्यमातून घेतली जाईल.
2) निवडीच्या निकषानुसार ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रथम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सदर यादीनुसार कागदपत्रांची पडताळणी करून अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
3) मौखिक चाचणी घेण्यात येणार नाही.
4) मागासवर्गीय उमेदवार असेल तर त्याला खुल्या किंवा तो ज्या जातीच्या आरक्षणात मोडत असेल अशा एकाच प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर करता येईल.
5) खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांची केवळ खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणूनच निवड केली जाईल (मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांसाठी निवड केली जाणार नाही).
6) ज्या मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठीच्या गुणवत्तेनुसार निवड होण्याची शक्यता वाटत नसेल त्यांनी ते ज्या प्रवर्गाचे असतील त्या प्रवर्गातूनच ऑनलाईन अर्ज सादर करावा.
7) अपंग उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या व मागास प्रवर्गातील सर्व गुणवत्ताधारक उमेदवारांची अपंगांच्या संबंधित आरक्षित पदांसाठी [म्हणजेच अंशतः दृष्टीहीन (PS), अंशत: कर्णबधीर (HH), अस्थिव्यंग / सेरेब्रल पाल्सी (OH/CP)] ऑनलाईन अर्ज सादर करावा.
8) निवडीच्या निकषांनुसार गुणवत्तेप्रमाणे प्रवर्गनिहाय समाजिक / समांतर आरक्षणाचा विचार करून अंतिम निवडयादी प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, सदर निवडयादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषंगिक प्रमाणपत्राच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल.

## VIII. <u>ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पद्धत</u> :-

1. कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि. 23.12.2015 ते 18.01.2016 रोजी पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. ऑनलाईन अर्ज दि. 18.01.2016 रोजी पर्यंतच स्विकारण्यात येतील.
2. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराने आपला वैध ई -मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे . तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे . उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई -मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास , तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण

भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा -या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील . तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा -या तांत्रिक अडचणींना बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही . बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई -मेल आयडीवर ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल . उमेदवाराने आपल्या ई -मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण -घेवाण करु नये . **<u>एखाद्या उमेदवाराचा वैध ई -मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.</u>**

4. ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही . ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणा -या ई -पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करून (printout) स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकित प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.
5. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता "Click here for new Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वतःकडे लिहून ठेवावा . तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई -मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल . उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुर ता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.
6. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज SUBMIT करण्यापूर्वी उमेदवाराने "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. अंतिम SUBMIT करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य रितीने भरली असल्याची खात्री करुन घ्यावी.
7. उमेदवाराने स्वतःचे/ वडिलांचे/ पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे . सदरची माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
8. उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व SAVE करण्यासाठी "Validate your details" आणि "SAVE AND NEXT" या बटनांचा वापर करावा.
9. ऑनलाईन अर्ज अंतिम SUBMIT करण्यापूर्वी "Preview" टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.
10. आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन , तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्यरितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "FINAL SUBMIT" बटनावर क्लिक करावे.
11. "Payment" बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.
12. त्यानंतर "SUBMIT" बटनावर क्लिक करावे.
13. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वतःबाबतची माहिती अचूक रितीने भरावी . तसेच विहित आकारातील स्वतःचे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतरच "SUBMIT" बटन प्रेस करावे . एकदा "SUBMIT" बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही . उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
14. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे . तद्नंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
15. उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.
16. उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव , सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

17. उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाल्यानंतर त्याच्या ई -मेल आयडी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एसएमएसद्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाला नाही असे समजावे.
18. अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येतील.
19. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस -या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.
20. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.
21. उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.
22. रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची प्रत मुद्रण करून (printout) स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे . ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वतः जबाबदार राहील त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

## <u>ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत</u>

1. ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

   **<u>परिक्षा शुल्कः</u>**

   **खुल्या प्रवर्गातील उमेदवार : रु. 400/-**

   **मागास/इतर मागासप्रवर्गातील उमेदवार : रु. 200/-**

2. परीक्षा शुल्क इंटरनेट बॅंकिंग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्डस किंवा Mobile Wallets द्वारे भरता येईल.
3. ऑनलाईन परीक्षा शुल्काचे Submission केल्यानंतर थोडा वेळ वाट पाहणे आवश्यक आहे . सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत Back किंवा Refresh बटन दाबु नये.
4. ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई -पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.
5. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉगीन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा यशस्वी न झाल्यास your online Transaction was unsuccessful please register again असा संदेश दिसेल. अशावेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुनःश्च लॉगीन करणे आवश्यक आहे.
6. नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती (E-Receipt) मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची प्रत मुद्रण करून (printout) काढुन ठेवणे आवश्यक आहे . ई-पावती उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्यावेळी प्रवेशपत्रासोबत सादर करावी.
7. Credit Card द्वारे परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी.
8. आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.
9. उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

## <u>छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना</u>

**<u>छायाचित्रः-</u>**

1. उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.
2. सदरचे छायाचित्र फीकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
3. कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पाहावे . सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी . फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
4. चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे . छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
5. छायाचित्र 200x230 pixels एवढे असावे व त्याचा आकार 20kb ते 50kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे 50 kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

**<u>स्वाक्षरीः-</u>**

1. उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करावी.

2. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.

3. अर्जासोबत अपलोड केलेले स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

4. स्वाक्षरीचा आकार 10kb ते 20kb व त्याचे Dimensions 140x160 pixels एवढे असावे. स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही 20kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

## <u>छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पध्दत.</u>

1. छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे . त्यासाठी स्कॅनरचे Resolution हे 200 डी.पी.आय. (Dots per inch) एवढे असावे.

2. कलर हा True colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.

3. उपरोक्त छायाचित्र व स्वाक्षरीबाबत दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र असणे आवश्यक आहे . त्याची फाईल ही JPG OR JPEG Format मध्ये असावी.

4. जर मुद्दा क्र.3 नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रीनवर Error Message दिसेल.

## <u>छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पध्दत.</u>

1. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत . उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी असलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.
2. उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पध्दत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.
3. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल . त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

## परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना

**केंद्र - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे मुंबई, ठाणे, पनवेल, कर्जत, पालघर या क्षेत्रात**

1. परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.
2. परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
3. बृहन्मुंबई महानगरपालिका कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.
4. बृहन्मुंबई महानगरपालिका, उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.
5. उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत :च्या जबाबदारी व स्वत :च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

**प्रवेशपत्र डाउनलोड करणे**

ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित Link वर Click केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताची window स्क्रीनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवाराने रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड /जन्मतारखेचा वापर करावा. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

**ओळख पटवणे**

i) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटोसहीत आधारकार्ड / बँकेचे फोटोसहीतचे पासबुक / महाविद्यालयाचे / विद्यापिठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे . उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र , हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल . जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

टिप:- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत :ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे , त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे . परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार ) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे . सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे . परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नांवात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही . **रेशन कार्ड व ई-Adhar कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.**

सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

1. परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र
2. मुळ फोटो ओळखपत्र
3. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

ii) परीक्षेला उशिरा येण्याबाबत :- परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही . प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होणाच्या आधीची असणार आहे . परीक्षेची वेळ जरी एक तास असली तरी उमेदवारास

ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे , परीक्षेसाठी लॉग इन करणे , सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण दोन तास अगोदर परीक्षा स्थळावर उपस्थित राहावे लागेल.

**निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक /अनुचित प्रकार /गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही**:-

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

**परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रीयेदरम्यान जर उमेदवार**,

1. अनुचित प्रकार करणे किंवा
2. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा
3. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा करणे किंवा
4. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा
5. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा
6. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास**

1. तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा -या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.
3. जर उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**इतर महत्वाच्या सुचनाः**

1. परीक्षा घेतांना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि / किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल . अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील . याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील . ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.

2. या भरती प्रक्रीयेअंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल . यासंबंधीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

3. एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळ्या सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.

4. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

5. शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.

6. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

7. उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता /अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

8. सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करून उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत (print out) on line प्राप्त करता येईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वतःजवळ ठेवावा. पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परिक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांनी सदर अर्ज, त्यावर स्वतःचा पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवून अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अटी क्र. 6 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह, नियुक्तीपूर्व सादर करणे आवश्यक आहे.

9. परिक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन -लाइन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही, तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

10. इतर कोणत्याही प द्धतीने उदा हरणार्थ पोस्टाने/कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

11. अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परिक्षेसाठी प्रवेश पत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे आणि त्याची प्रत (print out) काढावी.

12. उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वतःचे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परिक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.

13. ऑन-लाइन परीक्षा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे मुंबई , ठाणे, पनवेल, कर्जत, पालघर या क्षेत्रात घेण्यात येईल. तथापि, आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.

14. उमेदवारांना परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

15. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**IX) <u>Online नोंदणी व परिक्षेबाबतचे वेळापत्रक</u>**

| | | |
|---|---|---|
| ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | : | दि. 23.12.2015 ते दि. 18.01.2016 |
| नेट बॅंकिंगद्वारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी | : | दि. 23.12.2015 ते दि. 18.01.2016 |
| ऑन-लाईन परिक्षा | : | फेब्रुवारी - 2016 (दुसरा आठवडा) |

**(वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहातील.)**

**X) <u>सर्वसाधारण अटी</u> -**

1) सदर जाहिरातीमध्ये एकूण रिक्त पदांच्या संख्येत संभाव्य रिक्त पदेदेखील अंतर्भूत असल्याने उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि, तयार करण्यात आलेली निवड यादी कोणत्याही वेळेस पूर्व-सुचना न देता रद्द करण्याचे अथवा निवड यादीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. यास्तव उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट झाले तरीही सदर पदावर त्याचा नियुक्तीसाठी कोणताही अधिकार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो. यास्तव प्रत्येक पदाच्या बदल झालेल्या रिक्त पदानुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.

3) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र ऑन-लाइन अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

4) उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन-कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

5) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

6) उमेदवारांने नियुक्तीपूर्वी खाली नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

a) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मदाखला / अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),

b) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. (**marksheet** & **passing certificate**)

c) बी.कॉम. पदवी परीक्षेची गुणपत्रिका, उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र व विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र (Marksheet, Passing Certificate & Convocation Certificate of University). तथापि, बी.कॉम. परीक्षेची मूळ गुणपत्रिका पुढील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अथवा महाविद्यालय यांच्याकडे सुपूर्द केली असल्यास त्याबाबतचे संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय यांच्या सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्यांनीच साक्षांकित केलेली बी.कॉम. पदवी परीक्षेची छायांकित गुणपत्रिका आणणे अत्यंत आवश्यक आहे,

d) एस. एस .सी. / एच. एस. सी. व बी. कॉम. पदवी परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण झालेले असल्यास प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

e) सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र (latest Non Creamy-layer Certificate) नियुक्ती पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी, मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे नियुक्तीच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16बी दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल. मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवाराने संबधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक आहे,

f) महिला आरक्षणांतर्गत अर्ज करू इच्छिणा-या अजा/अज प्रवर्ग वगळता खुल्या वर्गासहीत इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत पडताळणीच्या दिवशी सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

g) उमेदवार सरकारी, निम-सरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer) ना-हरकत प्रमाणपत्र.

h) उमेदवार माजी सैनिक असल्यास विमुक्ती प्रमाणपत्र (Discharge Certificate),

i) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) / नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette) यांच्या मूळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच ते नसल्यास, विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

j) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (Employment exchange card),

k) उमेदवार मुंबई महानगरपालिका प्रकल्पांतर्गत बाधित (प्रकल्पग्रस्त) असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

l) अपंग उमेदवाराच्याबाबतीत किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.

m) फोटो असलेले ओळखपत्र. उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र इ. सोबत आणणे आवश्यक आहे.

n) "सुशिक्षित बेरोजगार आर्थिक सहाय्य" योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात वाणिज्य पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी म्हणून तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत व रोजगार मार्गदर्शन क्रेंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ''कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक'' या पदाची विहित अर्हता पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांनी अर्ज केल्याची नोंद रोजगार मार्गदर्शन क्रेंद्रामध्ये केल्याचा पुरावा संबंधित रोजगार मार्गदर्शन क्रेंद्राकडून प्राप्त करून पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

7) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

8) निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल. सदर अनामत रक्कम तीन वर्षांनंतर बिनव्याजी परत करण्यात येईल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरूनसुध्दा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना, त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

9) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळ्यांमध्येही (Shift duties) काम करावे लागेल.

10) उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे किंवा निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

11) निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 लागू होतील. तसेच शासन निर्णय क्र. अंनियो/1005/126/सेवा-4 दि. 31.10.2005 अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

12) सदर भरती-अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमित्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व तीन वर्षांनंतरचे सेवा-सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

13) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

14) निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची / तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

15) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे व रद्द करण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

16) शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या अपंग उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे अपंगत्वाच्या टक्केवारीची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर अपंग उमेदवार सदर पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

17) सुशिक्षित बेरोजगार या समांतर आरक्षणांतर्गत लाभ घेऊ इच्छिणारे उमेदवार वाणिज्य शाखेचे पदवीधर असले तरीही त्यांनी “कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक” या पदाची विहित अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड इतर उमेदवारांप्रमाणेच ऑनलाईन परीक्षेतील गुण विचारात घेऊन करण्यात येईल.

18) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करून दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

19) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु, सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

20) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.पअंक-1010/717/प्रक्र322/10/16-अ दि.26.08.2010 अन्वये एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्या उमेदवारास समांतर आरक्षणाचा पुन्हा लाभ देता येणार नाही.

21) शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.01.07.2005 लहान कुटूंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने / तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

22) तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हींपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधी ग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

23) खेळाडूंनी शासन निर्णय क्र. राक्रीधो-2002/प्रक्र/68/क्रीयुसे/2 दि.30.04.2005 व तद्नंतर सुधारित निर्णयानुसार गट `क' साठी क्रीडा विषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले असावेत. ते प्रमाणपत्र विधीग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

24) तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रीयेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत; या दोन्हींपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापी, सदर विधीग्राहय कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांकडे राहतील.

25) अपंग उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या तक्त्यामधील क.ले.प.व ले.स. पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारिरीक क्षमता / पात्रता यांची नोंद घ्यावी.

| पदनाम | कर्तव्य / जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता |
|---|---|---|
| कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक | कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक या पदाच्या अनुषंगाने येणारे लेखाविषयक कामकाज व इ. | S (बसणे), ST (उभे राहणे), W (चालणे), RW (वाचणे- लिहणे), C (संवाद साधणे), SE (पाहणे), H (हाताळणे), L (उचलणे), MF (बोटांची हालचाल करणे). |

26) काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परिक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

27) उमेदवाराने या भरती प्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

28) निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**I.** **<u>विशेष सूचना</u>** :-

1) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2) मध्यस्थ / ठग / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहाण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

3) से वायोजन कार्यालय प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

4) ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती व प्रत्यक्ष पडताळणीवेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास त्याचा अर्ज बाद ठरविण्यात येईल.

5) जाहिरातीमध्ये सदरच्या पदासाठी प्रत्येक प्रवर्गाकरिता विहित केलेली गुणांची किमान टक्केवारी प्राप्त न केलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नयेत.

6) सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

7) ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास <u>ca.recruitmenthelpdesk@mcgm.gov.in</u> हा ई-मेल आयडी दि. 23.12.2015 पासून उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन देण्यासाठी उपलब्ध होईल.

**सही/-**

**अति. आयुक्त (प्रकल्प)**

❖ **Questions in the test may be based on the given areas.**

| SR. NO. | SUBJECT | CONTENT |
|---|---|---|
| 1 | GENERAL KNOWLEDGE | i) **MUMBAI CITY**<br><br>Mumbai & Suburbs Cities, Railway (C.R., W.R. & H.R. Lines), Tourist Attractions, Heritage Structures, Public Transport, Geographical Area & Population, etc.<br><br>ii) **MCGM**<br><br>Duties & responsibilities, sources of income, Administrative Structure, Functions, Services & Water supply facilities Provided by MCGM, Census, etc. |
| 2 | INTELLECTUAL POTENTIAL | --- |
| 3 | ACCOUNTS RELATED KNOWLEDGE | i) **TAXATION**<br><br>Service Tax, Income Tax, VAT, Work Contract Tax<br><br>ii) **ACCOUNTING**<br><br>Income & Expenditure, Receivables & Payables, Trial Balance, Balance Sheet, Bank Reconciliation, Accrued based Double Entry, Depreciation, Inventory, Cash Transactions, Journal Entries, etc.<br><br>iii) **AUDITING**<br><br>Principles of Audit, Types of Audit<br><br>iv) **COSTING**<br><br>Prime Cost, Variable Cost, Cost Analysis, Cost Ratio |

**Note :**

ii) All tests will be held in English and Marathi.

iii) There is no any penalty (negative marking) for wrong answers.